# बृहन्मुंबई महानगरपालिका

प्रमुख वैद्यकीय अधिक्षक व खाते प्रमुख (माध्यमिक आरोग्य सेवा)

ॲक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालय,वडाळा मुंबई 400031

एचओ/450/एएलएच दि.03.07.2026

## जाहिरात

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील प्रमुख वैद्यकीय अधिक्षक व खाते प्रमुख (माध्यमिक आरोग्य सेवा) खात्यांतर्गत ॲक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालयाच्या आस्थापनेवरील 'निम्न वैद्यकीय कार्यकर्ता' या संवर्गाची रिक्त पदे प्रत्येकी 179 दिवसानंतर 01 दिवसाचा सेवा खंड देऊन कंत्राटी तत्वावर किंवा नियमित तत्वावर सदर पदे भरेपर्यंत यापैकी जे अगोदर असेल एवढया कालवधीसाठी कंत्राटी पध्दतीने भरण्यासाठी अर्हता धारण करणा-या व अटींची पुर्तता करण्या-या इच्छूक उमेदवारांकडून विहित नमुन्यामध्ये अर्ज मागविण्यात येत आहेत.

**पदांचा तपशील**

| अनु क्र. | पदनाम | एकुण पदे | ठोक मानधन | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| 01 | कंत्राटी निम्न वैद्यकीय कार्यकर्ता | 4 | 18000/- दरमाह | 1. उमेदवार उच्च माध्यमिक (10+2) शालांत परिक्षा उत्तीर्ण असावा.<br>2. उमेदवाराकडे 'कुष्ठरोग तंत्रज्ञ' म्हणून सरकारमान्य संस्थेचे प्रशिक्षण प्रमाणपत्र असावे.<br>3. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा वा तत्सम परीक्षा किंवा 100 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्चस्तर किंवा निम्नस्तर) घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>4. उमेदवाराने संगणकाचे ज्ञान असल्याबाबतचे शासन मान्य संस्थेचा अभ्यासक्रम पुर्ण केलेला असावा. |

**अर्ज प्रक्रिया** :-

अर्ज स्विकारण्याचे ठिकाण :-

वैद्यकिय अधिक्षक, ॲक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालय यांचे प्रशासकीय कार्यालय, मेजर परमेशवरन मार्ग, वडाळा (प) मुंबई 400031 येथे दि.14/07/2026 रोजी सायंकाळी 4 वाजेपर्यत सादर करावेत.

अर्ज करण्याचा कालावधी :- दि.06/07/2026 ते दि.14/07/2026

**अ) वयोमर्यादा**:-

**उमेदवाराचे अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास** (दि.14/07/2026)

1. उमेदवाराचे वय अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकास उमेदवाराचे किमान वय 18 वर्ष व कमाल वयोमर्यादा 38 वर्ष राहील.

**ब) <u>निवडीचे निकष व कार्यपध्दती:</u>-**

1. सदर पदाची विहित केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभवच्या गुणांच्या आधारे उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. गुणवत्ता यादीतील उमेदवारामधून निवड यादी तयार करण्यात येईल.

2. शासकिय व निम्न शासकिय संस्थेमध्ये कुष्ठरोग तंत्रज्ञ म्हणुन काम करण्याचा अनुभव असल्यास (किमान 06 महिने अनुभव) प्रत्येक सहा महिन्याच्या काम करण्याच्या अनुभवासाठी दोन गुण उच्च माध्यमिक (10+2) शालांत परिक्षेच्या गुणात अधिक केले जातील. किमान अधिकतम गुण 20 पर्यंत ग्राह्य धरण्यात येतील.
3. एकत्रित गुणवत्ता यादी, निवड यादी व प्रतिक्षा यादी रुग्णालयाच्या सुचना फलकावर प्रदर्शित करण्यात येईल.

**क) <u>अर्ज शुल्क</u> :**

उमेदवारांकडुन रु.870+ GST एवढे अर्ज शुल्क आकारण्यात येईल. कार्यालयातून चलन घेऊन अर्जाचे शुल्क महानगरपालिकेच्या नागरी सुविधा केंद्रात (CFC) रोखीत भरावे व शुल्क भरल्याची पावती विहीत कालावधीत सादर करावी. (सदर अर्ज शुल्क हे ना परतावा राहील व ते कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही.)

**ड) <u>'निम्न वैद्यकीय कार्यकर्ता ' पदाची कर्तव्यसूची</u>**

1. कुष्ठरोग विषयक सर्वेक्षण, आरोग्यशिक्षण आणि उपचार कार्यक्रमांचे आयोजन करणे,प्रकल्प क्षेत्रातील रुग्णाचा शोध घेणे, रुग्णांच्या नातेवाईकांची तपासणी करणे, रुग्णांचा पाठपुरावा करणे, व विविध विशेष कार्यक्रमाचे आयोजन करणे.
2. समांतरित दवाखान्यांमधील कामे पार पाडणे. त्यामध्ये रुग्णांची प्राथमिक तपासणी, जंतूपरिक्षण, रुग्णांचे कार्ड तयार करणे. तसेच उपचाराच्या नोंदी घेणे व कुष्ठविरोधी उपचार आणि सहाय्यक औषधांचे वाटप करणे. रुग्णांना हातापायांची काळजी घेण्याबाबतचे मार्गदर्शन करणे, नियमित उपचार घेण्याबाबतचे समुपदेशन करणे, बाह्यरुग्णविभागातील रुग्णांना जवळच्या दवाखान्यात /आरोग्यकेंद्रात पाठविणे आणि रुग्णांशी सबंधित दैनंदिन व मासिक नोंदीचा अहवाल तयार करणे.
3. रोग निदानासाठी आवश्यक जंतु परिक्षण, रुग्ण कार्ड व अन्य संबंधित दैनंदिन कामात मदत करणे.
4. दैनंदिन कामाचा त्याचप्रमाणे मासिक कामाचा,त्रैमासिक व वार्षिक कामाचा अहवाल तयार करणे.मासिक आढावा सभा तसेच शैक्षणिक सभा, प्रशिक्षण कार्यक्रम यामध्ये सक्रिय सहभागी होणे.
5. वरिष्ठांनी वेळोवेळी नेमून दिलेली इतर कामे.

**इ)<u>सर्वसाधरण अटी:</u>-**

1. ॲक्वर्थ रूग्णालयाच्या आस्थापनेवरील 'निम्न वैद्यकीय कार्यकर्ता 'या संवर्गाची 04 रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने 179 दिवसांच्या कालवधीकरीता प्रत्येकी रु.18000/- (अठरा हजार मात्र प्रतिमाह) मानधनावर अर्ज मागवून निवडीने भरण्यात येतील.
2. सदर पदाची निवडयादी पदासाठी आवश्यक (Qualifying Exam) मधील गुण म्हणजेच उच्च

माध्यमिक (10+2) शालांत परिक्षा आधारे बनविण्यात येईल.

3. शासकिय व निम्न शासकिय संस्थेमध्ये कुष्ठरोग तंत्रज्ञ म्हणुन काम करण्याचा अनुभव असल्यास (किमान 06 महिने अनुभव) प्रत्येक सहा महिन्याच्या काम करण्याच्या अनुभवासाठी दोन गुण उच्च माध्यमिक (10+2) शालांत परिक्षेच्या गुणात अधिक केले जातील. किमान अधिकतम गुण 20 पर्यंत ग्राह्य धरण्यात येतील.
4. उमेदवारांना सादर केलेल्या छायांकित प्रमाणपत्रांची मुळ कागदपत्रे घेवून दिलेल्या दिनांकास कार्यालयात हजर राहावे लागेल. सदर दिनांक आपणांस 5 दिवस आधी आपण दिलेल्या Email वर कळविण्यात येईल.
5. उमेदवाराने एकदा अर्ज केल्यानंतर विहित वेळ समाप्त झाल्यानंतर कोणतेही कागदपत्रे नंतर आणून दिल्यास ते कागदपत्रे ग्राह्य धरले जाणार नाही व त्याचा अर्ज अपूर्ण समजून अपात्र ठरविण्यात येईल.
6. सदर पदे ही कंत्राटी तत्वावर भरावयाची असल्याने उमेदवाराची किमान वयोमर्यादा 18 व कमाल वयोमर्यादा 38 वर्षे असावी.
7. नियुक्त झालेल्या कंत्राटी कर्मचा-याने राजीनामा दिल्यास अथवा सेवा सोडून गेल्यास यादीवर उपलब्ध पुढील असलेल्या उमेदवारास नियुक्ती देण्यात येईल.
8. नियुक्त झालेल्या उमेदवारास मनपा मध्ये कायमस्वरुपी सेवेसाठी कोणताही हक्क सांगता येणार नाही तसेच त्यांना नियमित सेवेचे कोणतेही फायदे अनुज्ञेय असणार नाहीत.
9. कंत्राटी कालावधीत काम करण्या-या उमेद्वारांची सेवा महानगरपालिकेच्या नियमित तत्वावरिल सेवेसाठी, सेवाजष्ठतेसाठी विचारात घेतली जाणार नाही किंवा सेवेचा सेवाजेष्ठतेसाठी प्राधान्य देण्यात येणार नाही, तसेच भविष्यात त्यांना 'निम्न वैद्यकीय कार्यकर्ता ' पदावर हक्क सांगता येणार नाही.
10. कंत्राटी कर्मचा-यांना देण्यात येणारे ठोक मानधना व्यतिरिक्त: कोणत्याही प्रकारचा महागाई भत्ता, घरभाडे भत्ता इत्यादी अनुज्ञेय असणार नाही.
11. उमेदवारानी विवाहनोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नमल्यास विवाहित महिला उमेदवार विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात.
12. उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास, तसेच उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी/न्यायालयिन प्रकरण प्रलंबित असल्यास/शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने त्याबाबत माहिती देणे आवश्यक आहे. (सदर अर्ज ग्राह्य धरला जाणार नाही.)
13. नियुक्त झालेल्या उमेदवारास रुग्णालयीन सोयीनुसार तसेच प्राप्त झालेल्या आदेशानुसार कर्तव्यावर हजर राहणे आवश्यक राहील.
14. उमेदवारास नियुक्त केलेल्या विभागातील सत्रांनुसार सहा महिन्यांकरिता 7.5 नैमित्तिक रजा अनुज्ञेय असेल, त्या व्यतिरिक्त इतर कोणतीही रजा अनुज्ञेय नाही.
15. कंत्राटी कालावधीत त्यांचे काम समाधानकारक न आढळल्यास कोणतीही पूर्व सुचना न देता समाप्त करण्याचे अधिकार मा. कार्यकारी आरोग्य अधिकारी/ खाते प्रमुख यांच्याकडे राहील.
16. त्यांची नेमणूक करार पध्दतीची असल्यामुळे त्यांना कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.
17. नियुक्तीच्या वेळी उमेदवाराकडून रु. 500/- बॉड पेपर वर करारनामा करून घेण्यात येईल.
18. दररोज नियमाने त्यांच्या कर्तव्याच्या वेळेनुसार बायोमॅट्रिक करावे लागेल अन्यथा त्यांना गैरहजर

धरण्यात येईल. त्यांची विना परवानगी गैरहजेरी विना वेतनी गैरहजेरी (LWP) करण्यात येईल.

19. रुग्णालय प्रमुखांच्या शिफारशीने असमाधानकारक कामाकरिता किंवा इतर कोणत्याही कारणासाठी मा. कार्यकारी आरोग्य अधिकारी/ खाते प्रमुख यांच्याकडे यांच्या स्वाक्षरीने सदर उमेदवारांची सेवा कोणतीही पूर्वसूचना दिल्याशिवाय समाप्त करण्यात येईल.
20. सदर कंत्राटी तत्त्वावरील पदधारकाच्या नियुक्ती कालावधीमध्ये उमेदवाराने शिस्तभंग केल्याचे निदर्शनास आल्यास त्याची नियुक्ती तात्काळ रदद करण्यांत येईल.
21. निवड झालेल्या उमेदवारास पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्याने 15 दिवसांची पूर्वसुचना देणे बंधनकारक आहे.
22. निवडप्रकिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्यास किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झालेली असल्यास कोणतीही पूर्वसुचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.
23. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव निवड प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा. कार्यकारी आरोग्य अधिकारी/ खाते प्रमुख यांना आहेत.
24. सेवायोजना कार्यालय/प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांना देखील या जाहिरातीनुसार वैयक्तिक माहितीपत्रासह आणि आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या मूळ व सांक्षाकित प्रतींसह हजर राहणे आवश्यक आहे.
25. जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाब आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींचा व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.

**फ)<u>विशेष सूचना</u> :-**

1. यापूर्वी संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी सादर केलेले/प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
2. बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादिंचा अधिकार दिलेला नाही. याची कृपया नोंद घ्यावी.
3. अर्जाचे विहित मुल्य भरुन त्याची पावती जोडल्याशिवाय अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.
4. टपालाने आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.
5. अपुर्ण भरलेले व पदासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रतेबाबतच्या कागदपत्रांच्या प्रती न-जोडलेले अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाही.

सही /-03.07.2026
वैद्यकीय अधिक्षक
ॲक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालय

बृहन्मुंबई महानगरपालिका
प्रमुख वैद्यकीय अधिक्षक व खाते प्रमुख (माध्यमिक आरोग्य सेवा)
ॲक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालय,वडाळा मुंबई 400031
दुरध्वनी क्र – 022-24147256 /24150355

**अर्जाचा नमुना**

पदाचे नाव:- 'निम्न वैद्यकीय कार्यकर्ता '(कंत्राटी)

| उमेदवाराचा फोटो |
|---|
| |

प्रति,
वैद्यकीय अधिक्षक
ॲक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालय
यांचे प्रशासकीय कार्यालय, मेजर
परमेश्वरनमार्ग, वडाळा (प) मुंबई 400031

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील प्रमुख वैद्यकीय अधिक्षक व खाते प्रमुख (माध्यमिक आरोग्य सेवा) खात्यांतर्गत ॲक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालय, वडाळा मध्ये ____________________ पदाकरिता दिनांक __________ च्या जाहिरातीनुसार मी खाली सही करणार विनंती अर्ज सादर करीत आहे. माझी सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे :

| | | |
|---|---|---|
| 1. | 1) संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) | |
| | 2) वडिलांचे / पतीचे संपूर्ण नाव | |
| | 3) उमेदवाराचे लग्नापूर्वीचे संपूर्ण नाव (महिला उमेदवारांच्या बाबतीत) | |
| 2. | पत्ता (पत्र व्यवहाराचा)<br>घरक्रमांक/ इमारती नाव<br>रस्त्याचे नाव विभागाचे नाव<br>आणि शहर पिन कोड नं. | |
| | जवळील रेल्वेस्थानक | |
| | टेलिफोन नं./ मोबाईल नं. | |
| | ई-मेल | |
| 3 | लिंग (पुरुष / स्त्री /इतर) | |
| 4 | (1) जन्मदिनांक | |
| | (ब) दिनांक 14/07/2026 रोजी असलेले वय ----वर्षे-----महिने------दिवस | |

| | | मिळालेले | पैकी |
|---|---|---|---|
| 5. | शालांत परिक्षेत मिळालेले गुण | | |
| 6. | शालांत परिक्षेत मराठी विषयातील प्राप्त गुण | | |
| 7. | उच्च माध्यमिक परिक्षेत मिळालेले गुण | | |
| 8. | 'कुष्ठरोग तंत्रज्ञ ' म्हणून सरकारमान्य संस्थेचे प्रशिक्षण प्रमाणपत्र **(अनिवार्य)** | | |
| 9. | कुष्ठरोग क्षेत्रात काम करण्याचा अनुभव | होय / नाही | |
| 10. | कुष्ठरोग क्षेत्रात काम करण्याचा अनुभवाचा कालवधी | ________________________________<br>________________________________ | |
| 11. | संगणक हाताळणीचे मान्यता दिलेला अभ्यासक्रम प्रमाणपत्र | आहे / नाही | |
| 12. | उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी /न्यायालयिन प्रकरण प्रलंबित/प्रस्तावित आहे ? असल्यास त्याबाबतचा तपशील द्यावा. | आहे / नाही | |

मी या अन्वये प्रतिज्ञा पूर्वक असे जाहीर करतो/ करते की, वरिल माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषानुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार, मी पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळ्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठच्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास त्याबाबत माझी काही ही तक्रार राहणार नाही. अर्जाद्वारे दिलेली कोणतीही माहीती खोटी आढळल्यास माझ्या विरूद्ध कायदेशीर कारवाई करू शकते याची मला जाणीव आहे.

आपला / आपली विश्वासू

अर्जदाराची सही

सोबत:-

1. शालांत परिक्षा प्रामाणपत्र छायांकीत प्रती (10th Marksheet & Board Certificate)
2. उच्च माध्यमिक प्रामाणपत्र छायांकीत प्रती (12th Marksheet & Board Certificate)
3. 'कुष्ठरोग तंत्रज्ञ ' म्हणून सरकारमान्य संस्थेचे प्रशिक्षण प्रमाणपत्र
4. अनुभव प्रमाणपत्र (किमान 6 महिने) (अनुभव असल्यास)
5. अर्जाचे विहित मुल्य भरल्याची पावती.
6. आधार व पॅन यांची छायांकित पत्र.

❖ **सर्व कागदपत्रांच्या छायांकीत प्रती स्वयंसांक्षांकीत करुन जोडण्यात याव्यात.**